# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/07/2023 (मंगळवार) सकाळ

---

## मंदीरातील चोरी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०.५ किमी अंतरावर गजानन महाराज मंदीर सावनेर येथे दिनांक २४/०७/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक २५/०७/२०२३ चे ०६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विनोद गजाननराव राऊत, वय ५७ वर्ष, रा. वार्ड नं. ०६ प्रोफेसर कॉलनी सावनेर (मंदीर व्यवस्थापक समितीचे सचिव) यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तोंडी रीपोर्ट दिली की, कोणीतरी अज्ञात चोराने गजानन महाराज मंदीर सावनेर येथील मुख्य लाकडी दरवाज्याला लावलेले कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश करून मंदीराच्या गाभाऱ्यात ठेवलेल्या ०२ स्टीलच्या दानपेटीतून नगदी ६७,०००/—रू. तसेच लोखंडी आलमारीचे लॉक तोडुन त्यामध्ये ठेवलेली अंदाजे १० ग्रॅम वजनाची किंमती अंदाजे १०००/—रू ची गजानन महाराजांची चांदीची मुर्ती, झेब्रॉनिक्स कंपनीचा होम थिएटर किंमती अंदाजे ५०००/—रू. स्टोअर रूम मधील लोखंडी आलमारीचे लॉक तोडुन त्यात ठेवलेले ०३ तांब्याचे गडवे किंमती अंदाजे ५००/—रू. तसेच चिल्लर पैसे नगदी ५००/—रू. असा एकुण ७४,०००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विक्की लोखंडे मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत वार्ड क्र. ३ पिपळा डाग बंगला येथे दिनांक २४/०७/२०२३ चे ००.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— रामकृष्ण हंमराज बावनकुळे, वय ५७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ पिपळा डाग बंगला याने आपल्या घरातील जुन्या फ्रिजच्या जाळया व टीव्हीची छत्री घराच्या स्लॅपवर ठेवली असता यातील **आरोपी नामे— हेमंत उंकडराव मरसकोल्हे, वय ३९ वर्ष, रा. जुनी ग्रामपंचायत वार्ड क्र. ३ पिपळा डाग बंगला** हा फिर्यादीच्या स्लॅपवरील जुन्या फ्रिजच्या जाळया व टीव्हीची छत्री असा एकुण ७,७००/— रुपयाचा मुद्देमाल चोरी करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल लोहकरे मो. नं. ८६६८८३३४७७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर